संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

रोखठोक बेधडक

संपादकीय.....

॥ न मे भक्त : प्रणश्यति ॥

# राज्याचे पर्यटन धोरण जागे होत आहे

महाराष्ट्रातल्या पर्यटन शक्तीची जाणीव नव्या सरकारचे देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आहे. गुजरातप्रमाणे महाराष्ट्राच्या पर्यटनाचाही विकास करण्याच्या उद्देशाने त्यांनी नागपुरात एक बैठक आयोजित करून श्रीगणेशा केलेला दिसतो. परंतु प्रत्येक वेळी सगळ्याच गोष्टी गुजरात राज्याला डोळ्यासमोर ठेवून करण्याची खरी प्रेरणा महाराष्ट्रातून मिळाली. कारण आजही जेवढे पर्यटक गुजरातला येतात त्यापेक्षा दुप्पट पर्यटक महाराष्ट्रातल्या विविध स्थळांना भेट देतात. अगदी आकडेवारीवरून या गोष्टी सिध्द होणाऱ्या आहेत आणि मग महाराष्ट्राप्रमाणे गुजरातचे पर्यटन वाढवावे, असा विशेष प्रयत्न नरेंद्र मोदी यांनी सुरू केला. त्यासाठी त्यांना मुंबईत राहणाऱ्या अमिताभ बच्चनलाच त्याचे ॲम्बेसेडर बनवावे लागले. महाराष्ट्रातल्या पर्यटनाची ताकद खूप मोठी आहे. कोकणाच्या विस्तीर्ण सागरी किनाऱ्यापासून अजंठा वेरुळसारख्या जगप्रसिध्द लेण्यांनी महाराष्ट्राचे नाव जगभर नेले आहे. मुंबईसारखी स्वप्ननगरी हे तर महाराष्ट्राच्या पर्यटनाचे भूषणच ठरते. जगातून येणारा प्रत्येक पर्यटक मुंबईच्या प्रेमात पडतो. जीवाची मुंबई करायला येणारा देशातला प्रत्येकजण मुंबईच्या नरिमन पॉईंटच्या राणीचा रत्नहार म्हणजेच क्वीन्स नेकलेस पाहून हरखून जातो. गड-किल्ल्यांचा शौर्यासाठी वारसा लाभलेल्या महाराष्ट्रात देवदेवस्थान किंवा सांस्कृतिक प्रतिकांची कमतरता नाही. ताडोबासारखे अभयारण्य किंवा महाबळेवर-माथेरानसारखी थंड हवेची ठिकाणेसुध्दा या महाराष्ट्राच्या नैसर्गिक संपदेची मोठी लक्षणे ठरतात. अशी कितीतरी गुणवैशिष्ट्ये असलेला महाराष्ट्र निसर्ग आणि सांस्कृतिकदृष्ट्या खूप संपन्न आणि समृध्द आहे. त्याची ही ओळख अधिक प्रभावीपणे देशभर आणि जगभर पसरविण्याची आवश्यकता आहे. मुंबईत असलेली चित्रनगरी हीसुध्दा देशातल्या अनेकांसाठी आकर्षणाचा विषय असते. ते चित्रपट कलाकार पहायला येतात. सगळ्या जगभर मुंबईत बॉलीवूड परिचित आहे. मग देशातल्या चित्रपट कलाकाराला भेटता आले पाहिजे. मुंबईतले हे चित्रपट कलाकार अब्जावधी रुपयांची कमाई करतात. त्यांनी महाराष्ट्राच्या पर्यटन विकासासाठी प्रत्येकाने जरी थोडा थोडा हातभार लावला तरी भरपूर काम होऊ शकते. आतापर्यंत हा पर्यटन व्यवसाय वाढविण्याचा सरकारी पध्दतीने प्रयत्न झाला; परंतु तो शेवटी सरकारीच ठरला. आता त्याला कॉर्पोरेट व्यवसायाची जोड दिली पाहिजे. इथल्या प्रत्येक स्थळाचा विकास करून अधिकाधिक पर्यटक कसे आकर्षित होतील, असे धोरण राबविले गेले पाहिजे. केवळ गुजरातसारखा महाराष्ट्राचा पर्यटन विकास करायचा म्हणजे अमिताभ बच्चनच्या तोडीचा कलाकार ॲम्बेसेडर नेमला म्हणजे काम झाले असे समजण्याचे कारण नाही. गुजरातपेक्षाही खूप वेगळ्या पध्दतीने महाराष्ट्राचे पर्यटन धोरण विकसित करता येऊ शकते; परंतु त्याला असलेले सरकारी दृष्टीने राजकीय हस्तक्षेपाचे ग्रहण संपले पाहिजे.

### महाराष्ट्राची भौगोलिक संपन्नता

महाराष्ट्र हे राज्यच खरे तर वेगळ्या इतिहासाची साक्ष देणारे आहे. इथली भौगोलिक परिस्थिती किंवा इथला इतिहास नीट समजून घेतला तरी त्यातून नव्या पर्यटनाच्या शेकडो पाऊणखुणा सापडू शकतील. म्हणून हे नवे धोरण ठरवितांना केवळ सरकारी पध्दतीच्या बैठका घेऊन न थांबता इतिहास तज्ज्ञ, सांस्कृतिक क्षेत्राचे प्रतिनिधी यांचे सहकार्य घेऊन विचारविनिमय झाले पाहिजेत. महाराष्ट्राची भूमी अग्निजन्य खडकांची बनलेली आहे. महाराष्ट्रात भूगर्भात असे खडक आहेत, त्यांच्यावर दक्षिणेचे पठार पसरलेले आहे. सह्य पर्वताची निर्मिती ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे झालेली आहे. यालाच पश्चिम घाट असे म्हणतात हा पर्वत तापीपासून कन्याकुमारीपर्यंत सुमारे ११०० मैल लांब पसरलेला आहे.सिंधुसागर व सह्याद्री यांच्यामधील अरुंद प्रदेशाला कोकण म्हणतात. त्याची रुंदी २५ ते ६० मैल व लांबी दमणपासून गोव्यापर्यंत सुमारे ३५० मैल आहे. त्यात सह्याद्रीच्या अनेक रांगा पसरलेल्या आहेत. महाराष्ट्राच्या उत्तर सीमेवर पसरलेला सातपुडा पर्वत हा सह्याद्रीचाच एक भाग आहे. नर्मदा नदी त्याच्या उत्तरेला आहे. सह्य व सातपुडा या दोन पर्वतांमधील विस्तृत प्रदेशाला दख्खनचे पठार म्हणतात. सातपुडा पर्वत तापीच्या मुखापासून अमरकंटकपर्यंत सुमारे ६०० मैल लांब पसरलेला आहे. दख्खनच्या पठारालाच देश असेही नाव आहे. त्यातला सातमाळा हा डोंगर नाशिक जिल्ह्याच्या वायव्य कोपऱ्यात सुरू होतो. या डोंगराची एक रांग बुलढाण्यापर्यंत आणि दुसरी देवगिरी सिंदखेडवरून परभरणीपर्यंत गेलेली आहे. पहिल्या रांगेत अजंठ्याची लेणी व दुसऱ्या रांगेत वेरुळची लेणी आहेत. असा हा भौगोलिक संपन्नता लाभलेला प्रदेश पर्यटनातून अधिक आकर्षक करता येऊ शकतो. आणि त्या माध्यमातून त्या परिसरात उत्पन्नाचे साधन बनू शकतो.

### रोजगाराचे माध्यम

महाराष्ट्राच्या पर्यटनाने धोरण आखताना विकास हाच मुद्दा महत्त्वाचा ठरू शकतो. कारण पर्यटनातून शासनाला काही प्रमाणात महसूल तर मिळतोच; पण त्यापेक्षाही त्यातून निर्माण होणारा रोजगार ही फार मोठी पुंजी ठरते. कारण एखादे पर्यटन स्थळ विकसित झाल्याबरोबर त्या परिसरात वीज, पाणी, रस्ते, नळ, दवाखाने अशा सगळ्या सुविधा येतात. रिक्षा, टॅक्सी, हॉटेल्स किंवा लॉजिंग-बोर्डिंगसारख्या गोष्टींची आपोआपच गरज निर्माण होते.पर्यटकांची सोय किंवा त्यांना सुविधा देण्यासाठी या गोष्टींची आवश्यकता असतेच आणि त्यातून स्थानिक स्तरावर मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होतो. म्हणूनच पर्यटन हे केवळ महसुली उत्पन्नाचे साधन नाही तर ते त्या त्या भागाचा विकास साधण्यासाठी उत्कृष्ट माध्यमही आहे. आजच्या बेरोजगारीच्या समस्येला तोंड देण्यासाठी काही प्रमाणात का होईना; परंतु पर्यटन हातभार लावू शकते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे यानिमित्ताने त्या त्या राज्याचे सांस्कृतिक धोरणही अधिक प्रगल्भ होत जाते.